*गवर, नभ उतरू आलं, राखीव सावल्यांचा खेळ* यांसारख्या कथा कष्टकरी स्त्रियांच्या आत्मभानाबद्दल कदाचित काहीएक विधान करू पाहतात. पण इथं एक प्रश्न सहज विचारता येईल की– ''किरण गुरव, तुमच्या या कथा तुम्ही म्हणता त्या शेता–शिवारातल्या स्त्रिया वाचतात का?'' तर, माझं त्याला उत्तर असं आहे की, ''एक पुरुष लेखक म्हणून माझ्याजवळ मुक्तीचा तेवढाच एक मार्ग आहे.''

# ललित ग्रंथ पुरस्कार : राखीव सावल्यांचा खेळ (कथासंग्रह)

## **किरण गुरव**

*kiranguruv2010@gmail.com*
*mob : 9420456440*



प्रयोग करत होते. त्यामुळे अस्थिरतेचा अनुभव मला लहानपणापासून नकळत येत असावा आणि स्थिरतेकडे माझा जास्त ओढा असावा, असं (विनोदानं) म्हणता येईल. बालपणीचा माझा बराचसा काळ कपिलेश्वर या छोट्याशा गावात (आजोळी) गेला. आम्ही गुरव असल्यानं साहजिकच देवळं, देवपूजा, कौल लावणं, तथाकथित शिवकळा अंगात येणं, बकऱ्या-कोंबड्याच्या जत्रा-खेत्रा, सोप्यात ढीगभर पडलेल्या पळसाच्या हिरव्यागार मखमली पानांतून डावी-उजवी पानं हेरून ईर्षेईर्षेनं इस्ताऱ्या किंवा पत्रावळी करणं, द्रोण लावणं इ. भानगडीत माझा तो काळ प्रामुख्याने गेला. त्यात आजोबांच्या हाताखाली देवस्थान जमिनीतली छोटीशी सीझनल शेतीही आलीच. पुढं शिक्षणासाठी कोल्हापूर, मग नोकरीला पुणे, गारगोटी- परत कोल्हापूर- अशी छोटीशी गरगर माझ्या आजपर्यंतच्या काळात आहे. आता तुम्ही म्हणता तशी भूमी परिसरांची अनाम ओढ असेल, तर ती आपल्या स्वग्रामाचं नेणिवेतील स्थलमाहात्म्य म्हणूनही पाहता येईल. *जुगाड* या माझ्या आगामी कादंबरीमध्ये असे काही अनुभव मी मांडले आहेत.

आपल्या प्रश्नाकडे परत यायचं झालं तर ज्या मातीत साप राहतो, त्या मातीचा रंग त्याला निसर्गानं चढवलेला असतो, असं म्हणतात. माझ्यावर चढलेला मूळ रंग माझ्या राधानगरी या गावचा आणि दऱ्या-खोऱ्यांच्या आजूबाजूच्या परिसराचा आहे. इथली माणसं, त्यांचे स्वभाव, अल्पसंतुष्टता, शहरबुजरेपणा आणि बेसावध असताना ओरबडणाऱ्या करवंदाच्या काटेरी डहाळीसारखी त्यांची भाषा- (जी नंतर एखादं काळंशार रसरशीत करवंदासारखं शब्दफळ पुढं करते) यांचा माझ्यावर मूळ संस्कार आहे. बाकी नित्याचं आणि

किरण गुरव हा या समकालीन कथासाखळीतला महत्त्वाचा कथाआवाज आहे. देशी कथनपरंपरेतले धूसर झालेले शक्यतासामर्थ्य उजागर करणारा कथालेखक आहे. *राखीव सावल्यांचा खेळ* आणि *श्रीलिपी* हे त्याचे दोन संग्रह एकाच वर्षी (२०१२) प्रकाशित झाले. *राखीव सावल्यांचा खेळ*-मधील कथांचे तुलनेने बरेचसे कौतुक झाले. मात्र *श्रीलिपी* मधील कथाही तितकीच आशय-रूपसंपन्न आहे.

राधानगरी परिसरावर किरणची अपरंपार माया. या मायेच्या आदिबंधाने सतत त्याच्या कथेला ऊर्जा पुरविली आहे. शहरात तो काहीसा अलिप्तपणाने वावरतो. नागरी प्रमाणबद्ध रीतींना तो बुजतो. अडखळतो. भांबावतो. बऱ्याच वेळेला नागर भवतालाशी जुळवून घेताना त्याची दमछाकही होत असावी. मात्र तो ती निर्विकारपणे टिपतही असतो. एखाद्या क्षणी मिश्किलपणाने याचा अल्पसा उच्चारही करतो.

किरणच्या कथेतून विविध प्रकारचे जाणीवविश्व आविष्कृत झालेले आहे. संकेतशरण स्थितिशील ग्रामीण कथेपेक्षा वेगळ्या संवेदनशीलतेची कथा त्याने लिहिली आहे. नव्या भौतिक गतिशील बदलांमुळे ग्रामरचनेतील सत्तासंबंधापासून ते मानसिक रचनेपर्यंतचे कायापालट होत आहेत. सभोवताली होणाऱ्या पडझडीबरोबरच जुने चालत आलेले पारंपरिक भावविश्वही या अवकाशात उपस्थित आहे. या दुहेरी तणावातून किरणची कथा निष्पन्न झाली आहे. किंवा किरणच्या कथासृष्टीला या बदलत्या कालावकाशाने विषय पुरविले आहेत.

तंत्रज्ञान-प्रभावित भांडवली रचनेची समाजव्यवस्था आकाराला येते आहे. त्यातून नवे वास्तव रचले जात आहे. जुन्या पिढीतील लोकांची अवस्था या काळात अधांतरी स्वरूपाची होते आहे. एकाच काळात परस्परविरोधी विचित्रे निर्माण झाली आहेत. एक प्रकारचे दिशाहीन भांबावलेपण समाजाला आलेले आहे. *बघता बघता खालची जमीन, नद्या, हिरवी रानं हे सारं झपाट्यानं लांब लांब-खोल जात आहे. छाती दडपडणाऱ्या वेगाचं पुढं काय होणार आहे? आकाश आणि भूमी या निर्वात पोकळीत कःपदार्थ होऊन भ्रामक गतीनं आपण निव्वळ तरंगत आहोत.* या जाणिवेचे सूचन करणारी *श्रीलिपी*सारखी महत्त्वाची कथा किरणने लिहिली आहे. दोन पिढ्यांतील अंतराय, विसंवाद आणि काळाच्या गतिशीलतेने मानवी संबंधांवर झालेले परिणाम ती तीव्रपणाने मांडते. तरुणांची घुसमट तिच्या

नैमित्तिक जगणं तर कार्यालयीन परिवेशासारखं असतंच; पण लेखक म्हणून जेव्हा मी पांढऱ्यावर निळं करत असतो, त्या वेळी माझ्याजवळ हा मूळ संस्कार जास्त उपलब्ध असतो.

लहान असताना सलग काही वर्षे आजोळी राहिल्यानं तिथल्या आजी-आजोबांचा, वातावरणाचा, परिसराचाही माझ्यावर सखोल ठसा उमटलेला आहे. माझे आजी-आजोबा खूप प्रामाणिक, कष्टाळू आणि नेकदिल माणसं होती. आजी अजूनही आहे, तिला आम्ही तानूआईच म्हणतो. मला मामा नसल्यानं हे आजोळंच साम्राज्य आता लयाला जाण्याच्या मार्गावर आहे. असो. तर या पार्श्वभूमीमुळे व प्रभावामुळे *राखीव सावल्यांचा खेळ* हा कथासंग्रह मी माझ्या आजीस व कपिलेश्वर- खरं तर कपलेसर असाच लोकोच्चार या गावाचा माझ्या भागात आहे- यांना अर्पण केला आहे.

**प्रश्न :** मराठी ग्रामीण कथाकारांकडून आणि पूर्वसुरींतील लेखनपरंपरेतून कोणते प्रभावस्रोत तुमच्यापर्यंत आले आहेत?

- मराठी ग्रामीण कथेकडून किंवा एकंदरीत साहित्याकडून (लिहिण्यासाठी आणि जगण्यासाठी) मला भरपूर काही मिळाले आहे. व्यंकटेश माडगूळकरांसारखा लेखक कथा-कादंबरी लिहिताना 'आपण का लिहितो,' याचाही शोध घेणारे ललित लेखन करत असतो आपण हे सगळं समजून घेणं खूप महत्त्वाचं आहे, असं मला वाचक म्हणून नेहमी वाटत आलं आहे. चारुता सागर, सखा कलाल या कथाकारांचं बोट धरून त्यांच्या कथासृष्टीत प्रवेश केला, अचंबित आणि समृद्ध करणारं पुष्कळ काही या कथाकारांच्या नजरेनं पाहू शकलो. तेव्हा आपणही असं लिहावं- निदान प्रयत्न करावा, असा विचार मनात येणं हाच लिहिण्याचा

कोलाहलासह साकार झालेली आहे.

लोकशाहीच्या प्रक्रियेतून गावपातळीवर समाजगटांचे झालेले ध्रुवीकरण व तीव्र स्वरूपाच्या सत्तास्पर्धेमुळे परंपरागत समूहमनावर उमटलेले ओरखडे याचे चित्रण किरणच्या कथेत आहे. नव्या अर्थव्यवस्थेमुळे सामाजिक पर्यावरणात उभे राहिलेले ताण *बाजार- दि मार्केट, वडाप* यासारख्या कथांमधून व्यक्त झाले आहेत.

बहुतांश मराठी कथांमध्ये बाह्य तपशिलाला महत्त्व देऊन सपाट एकरंगी आशय सुमूर्त केलेला असतो. या कथावाचनाचा संस्कार हा केवळ तपशील भरणाऱ्या समाजदर्शनाचा असतो. किरणच्या काही कथा या विचारकक्षेचे प्रभावी अंकन करतात. कथावाचनाच्या गडद अशा संस्कारठशांतून वाचकमनात विचारांचा घनदाट ठसा उमटतो. आतून-बाहेरून त्या अनुभवाने तो पालटतो. एकेक तपशील रचत अंतिमतः त्या अनुभवाच्या एकमयी चित्रातून वाचकांचे विचारभान एकदम पालटते. *काळी कपिला गाय* मध्ये या प्रकारच्या गोठवून टाकणाऱ्या अनुभवांचे उंचीवरचे स्थिरचित्र आहे.

किरणचे कथारूपही वैशिष्ट्यपूर्ण आहे. कथनरूपाचे स्वतंत्र भान या कथेला आहे. एक तर दीर्घ कथेचा रूपबंध तो वापरतो. वर्णन, निवेदन, संवाद, बोली व तिची प्रादेशिक मोडणी फार कल्पकपणे तो वापरतो. राधानगरी (कोल्हापूर) बोलींच्या व संस्कृतीच्या गडद रंगभाषांनी ती आकाराला आलेली आहे. लुप्त झालेल्या मराठी कथनपरंपरेतील पारंपरिक अलंकरणवापराचे नूतनीकरण त्याने केले आहे. प्रतिमा-प्रतीके-रूपकांची खचाखच भरलेली वर्णने तीमध्ये आहेत. खास अशी प्रादेशिक, लिंगभाषेची वेगळी भाषारूपे त्यामध्ये आहेत.

किरणच्या कथेची शैली ही समूहसंस्कृतीचा सजीव भाषिक अवकाश, लोकपरंपरेने रचलेली सांस्कृतिक रूपतत्त्वे घेऊन व सकस अशा अभिजात वाङ्‌मयीन कृतीच्या वाचन-व्यासंगातून *घडविलेली* आहे. या गद्यशैलीत घडीव असे संपृक्तपण आहे. एकाच वेळी अभिजात व देशी रचनाबंधाचे एकात्म फ्यूजन किरणच्या कथेत आहे. कथेच्या प्रभावी अशा जाणीवविश्वाबरोबरच कलात्मक रूपाला स्वायत्त असे स्थान देणारे हे कथारूप आहे. जुन्या गोष्टीतील *अटिंग्या वनाच्या सफरीची* नवी कथा किरण लिहितो आहे.

आरंभबिंदू असावा.

चार भिंतींआड कोंडून लेखक लिहू लागला की त्याचा शब्दही कोंडतो, असं बजावणाऱ्या चारुता सागरांच्या म्हणण्याचा इत्यर्थ कळतो. त्यांच्या कथेत गावशिवेची मर्यादा ओलांडून बेरड-फिरस्त्यांचं, पशू-पक्ष्यांचं, सरीसृपांचं जीवन का येतं त्याचा उगम कळतो. स्त्रीजन्माच्या सनातन वेदनेला हा लेखक कसा काय कथात्म उच्चार देऊ शकतो, त्याचा अंदाज बांधता येतो. लिहिणं ही तांत्रिक अर्थानं एका जागी बसून थोडी एकाग्र चित्ताने करायची गोष्ट असली, तरी जीवनाचा किती तरी मोठा पट त्यापाठीमागे उभा असतो याचं भान नकळत का असेना, असावं लागतं. मला वाटतं- माडगूळकर, सखा कलाल, चारुता सागर या पूर्वसूरींच्या कथाकारांनी माझ्यात हे भान निर्माण केलं आहे.

याशिवाय भाऊ पाध्ये, मेघना पेठे यांच्या नागर कथेनंही महानगरीय जीवनातले ताणे-बाणे, पेच, प्रासंगिकता, भर गर्दीतला एकटेपणा यांच्याशी मला परिचित केलं आहे.

ग्रामीण व नागर समाजरचनेच्या सीमेवर अर्धनागरीकरणानं गेल्या एक-दोन दशकांत जोर पकडलेला आहे. शिक्षण, दळणवळणाची साधनं, प्रसारमाध्यमं यांच्यामुळे नागरसंस्कृतीची ओळख होऊन 'ग्रामीण अर्धनागर' अशा संमिश्र जीवनव्यवस्थेचा उगम झाला आणि तो आता ठळक होऊ लागला आहे. यातलं बरं-वाईट शोधणं समाजशास्त्रीय अर्थानं सोपं नाही. पण *ढव्ह आणि लख्ख ऊन, रिवणावायली मुंगी, तिच्या वळणाची गोष्ट* इत्यादी राजन गवस यांच्या कथा या अर्धनागर समूहांच्या घडणीचा कथारूप उद्गार आहे, असं मला वाटतं. समकालाचं भान आणि आपल्या आजूबाजूच्या जीवनव्यवस्थेकडं बघण्याची एक नवी दृष्टी या कथांनी मला दिली आहे.

एकंदरीत, पूर्वसूरींच्या कथाकारांनी कथा काय असते, हे मला सांगितलं आणि कथा लिहायची असेल तर हे सगळे प्रभावस्रोत पचवून स्वतःची नवी वाट शोधली पाहिजे, याचं भान कळत-नकळत आणून दिलं.

**प्रश्न :** अर्धनागर तालुकावजा गावाचा नव्या काळातला नकाशा तुमच्या कथेत आहे. तुमच्या दोनही कथासंग्रहांतील कथांमधून तो प्रभावीरीत्या प्रकट झाला आहे. भौतिक व मानसिक दृष्ट्या पालटलेल्या जगाची, गावसंस्कृतीची संवेदना त्या कथांमध्ये आहे. तंत्रज्ञानाधिष्ठित अफाट वेगात घडणारे बदल तुम्ही फार संवेदनशीलतेने टिपलेले आहेत. याकडे तुम्ही कसे पाहता?

- स्वातंत्र्योत्तर काळात गावगाड्यात अपरिहार्यपणे बदल होत गेला आहे. माझ्या लहानपणाच्या आठवणीतल्या खेड्यात साधारणतः गावाचा म्हणून जो काही एकसंधपणा असतो तो टिकून होता. कदाचित आपलं अवधान त्या वयात एकाग्र असतं म्हणूनही तसं वाटत असेल. पण रस्ते, वीज, शिक्षणाची आणि दळणवळणाची साधनं यांद्वारे गावात बाह्य बदल होत असताना, गावाचा पारंपरिक ढाचाही बदलत गेला आहे. म्हणून अमुक गल्ली, तमुक गल्ली, हा अमुक जातीचा वाडा- तो तमूक जातीचा वाडा हे बरंचसं आजही टिकून असलं तरी आर्थिक दृष्टीने सक्षम झालेल्या लोकांनी त्याबाहेर पडून गावात घरं बांधली आहेत, दुकानं थाटली आहेत. हा बदल सकारात्मक आहे.

थोडं पुढं जाऊन ज्या अर्धनागरीकरणाबाबत आपण आत्ता बोललो, त्याची गावातील प्रत्यक्ष आणि दृश्य उपस्थिती आपणाला बघायची असेल; तर थोड्याशा मोठ्या गावात बघावी लागेल. *श्रीलिपी* या कथासंग्रहातल्या शीर्षककथेतले सर हे गावात नव्यानं झालेल्या *साईनगरात* (त्यांच्या शेतकरी ज्येष्ठ बंधूंच्या भाषेत) *बंगल्या* बांधून राहत आहेत. परिस्थितीनं गांजलेल्या या गरीब कर्जबाजारी मोठ्या भावाबरोबर सरांनी आपल्या बाजूनं संवाद जाणीवपूर्वक आटवलेला आहे. तरीही मूळ गावठाणातल्या जुन्या घरासमोरून काही निमित्ताने ते ये-जा करतात; तेव्हा अडगळीत पडलेल्या फुटक्या कंदिलासारखा आपल्या आयुष्याचा पूर्वकाळ या घरात अडकून पडलेला आहे, याची जाणीव सरांना अस्वस्थ करते. हीच अस्वस्थता घेऊन एका बाजूनं त्यांचा कथाभर वावर आहे. दुसऱ्या बाजूनं त्यांचा मुलगा प्रवीण आणि संगणकयुगात प्रवेश करण्याकरता शासनानं बंधनकारक केलेली *MS-CIT* ची परीक्षा यांच्या रूपानं अतिआधुनिक तंत्रयुगाची वाटही त्यांच्या आयुष्यात थोडी किलकिली झाली आहे. कथेची शंभरेक पानं, सर आपल्या आजूबाजूला वेगानं बदलत जाणाऱ्या वास्तवाशी आणि *MS-CIT* परीक्षेशी झटापट करतात. शेवटी पोराच्या अप्रत्यक्ष आधारानं कसेबसे पास होतात.

घरी आल्यानंतर अल्पशा ॲलर्जीनं किंचित आजारी पडतात आणि टीव्हीवर देश-विदेशातल्या बहुढंगी खबरी बघता बघता झोपी जातात. त्यांच्या स्वप्नात एक अवकाशयान येतं आणि त्यात बसून सर उड्डाण करतात. गतीच्या एका विशिष्ट टप्प्यावर आपली खालची-वरची दिशा हरवल्यानं विश्वाच्या या अनंत पोकळीत आपण कःपदार्थ होऊन निव्वळ तरंगत आहोत, असा भयाण भासही सरांना होतो. आणि मग अंगांवरचं पांघरूण फेकत सर जागे होताना आपलं वर्गातलं नेहमीचं यशस्वी निबंधलेखनातील पालुपद मोठ्यानं उच्चारत जागे होतात. *माझी व्यथा, माझे शल्य, माझे दुःख, माझा त्रास...*

तंत्रज्ञान हे मुळात विज्ञान आहे. आणि विज्ञान हा मानवाचा सृष्टिशोध. विज्ञान काही मर्यादेपर्यंत मानवी आयुष्य सुकर, सुरक्षित, स्वस्थ करतं ही गोष्ट खरी आहे आणि तिथपर्यंत त्यांचं महत्त्वही मान्य केलं पाहिजे. पण *यंत्र भेदून नाद* पाहण्याचा जो अतिरेकी प्रयत्न होतो आहे, त्याला थोडी विवेकाची मर्यादा असणं आवश्यक आहे. अगदी आता सगळीकडं गाजणारा विकासाचा मुद्दाही त्यादृष्टीने पाहता येईल. कोणाचा विकास? कशाचा विकास? कशा पद्धतीनं विकास? या मूलभूत गोष्टींवरचं सगळ्यांचं लक्ष हटवून निव्वळ विकासाचा डांगोरा पिटणं सुरू आहे. गरीब-अर्धपोटी लोकांना या भूलथापांवर खोटा-खोटा का होईना, पण विश्वास ठेवल्याशिवाय गत्यंतर नाही. कारण दुसरं कोणी एवढं खोटं बोलण्याचेही श्रम घ्यायला तयार नाही.

**प्रश्न :** स्त्रीचित्रणाला तुमच्या कथेत महत्त्वाचे स्थान आहे. ग्रामीण परिसरातील बायकांच्या जगातील अनेक परी तुमच्या कथेत आहेत. त्यांच्या जगण्यातले सूक्ष्म भाव चित्रित झाले आहेत. बऱ्याच वेळेला ते कायांतरणाच्या पातळीवरचे आहे. एकाच वेळी शिवारातील व माजघरातील जग तुमच्या कथेत प्रभावीपणे आलेले आहे.

– शहर आणि खेड्यातल्या भेदांबाबत पुष्कळदा बोललं जातं, पण खेड्यातल्या अंतर्विरोधाबाबत फारसं बोललं जात नाही. जाती-पातींमध्ये विभागलेली विषम, अन्यायी समाजरचना अजूनही खेड्यात आपली मूळची दमनकारी यंत्रणा टिकवून आहे. पण त्याचबरोबरीनं- किंबहुना, काकणभर सरस पद्धतीनं स्त्री-पुरुष विषमता खेड्या-पाड्यांमध्ये आपला प्रभाव टिकवून आहे. दलितांना त्यांच्या दलितत्वाची जाणीव झाल्यावर जशी त्यातून दलितोद्धारक चळवळ उभी राहिली, काहीएक साहित्यविचार त्यातून प्रकट झाला; तसं काही तरी या खेड्यापाड्यांतील गरीब, कष्टाळू स्त्रियांच्या बाबतीत व्हायला पाहिजे. खरं तर स्त्रीवादी चळवळी या बऱ्याचशा शहरकेंद्रित आहेत. त्यांच्याच भाषेत सांगायचं झालं तर ग्रासरूट लेव्हलपर्यंत, लहानातल्या लहान गावापर्यंत त्या पोहोचलेल्या नाहीत. त्यामुळे या खेड्यातल्या स्त्रियांना थोडं आत्मभान येणं गरजेचं आहे. गावातली शेती जशी पावसाच्या लहरीपणावर अवलंबून असते तसा या स्त्रियांचा संसार त्यांच्या *दादल्यांच्या लहरीपणावर* अवलंबून असतो. नवरा या दमनकारी सत्ताधीशाची दाट छाया या स्त्रियांच्या तना-मनावर पडलेली असते. वास्तविक, पुरुषाच्या बरोबरीने- किंबहुना, फारच सरस असं मी म्हणेन- कष्ट करूनही कुटुंब-व्यवस्थेतल्या निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचं स्थान शून्य असतं. अजूनही मूल न होणे, झालं तर मुलगीच होणे या गोष्टीसाठी तिलाच दोषी धरलं जातं.

स्त्रियांच्या शिक्षणाचा हक्क, राजकीय व्यवस्थेमध्ये कायद्याद्वारे त्यांना देण्यात आलेलं स्थान, नोकऱ्यांमधलं आरक्षण यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी आपण पाहू लागलो तर फार विदारक दृश्य दिसतं. *गवर, नभ उतरू आलं, राखीव सावल्यांचा खेळ* यांसारख्या कथा कष्टकरी स्त्रियांच्या आत्मभानाबद्दल कदाचित काहीएक विधान करू पाहतात. पण इथं एक प्रश्न सहज विचारता येईल की- ''किरण गुरव, तुमच्या या कथा तुम्ही म्हणता त्या शेता-शिवारातल्या स्त्रिया वाचतात का?'' तर, माझं त्याला उत्तर असं आहे की, ''एक पुरुष लेखक म्हणून माझ्याजवळ मुक्तीचा तेवढाच एक मार्ग आहे.''

**रणधीर शिंदे**
*suniltambe07@gmail.com*
*mob 9890913031*